आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१४ सप्टेंबर २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- १० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाला प्रारंभ/ देशात सर्वत्र सणाचा उत्साह

- बहुभाषिक संस्कृती असलेल्या महाराष्ट्रानं सर्व भाषकांना मोठ्या मनानं सामावून घेतलं असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- घाऊक किमतीवर आधारित चलन फुगवट्याच्या दरात ९ पूर्णांक ९२ शतांश टक्के वाढ

- दिशा सालियान मृत्यू प्रकरणी सीबीआयकडून एफआयआर दाखल

**आणि**

- अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत अलेक्झांडर झ्वेरेव्ह अजिंक्य

**<><><><><>**

आज भाद्रपद शुद्ध चतुर्थी म्हणजेच गणेशचतुर्थी. १० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाचा प्रारंभ आज झाला. गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीनं आणि कमीतकमी प्रदूषण होईल अशा प्रकारे साजरा करण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं. मुंबईत वर्षा निवासस्थानी श्री गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना आणि पूजा केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते….

**- - - होल्ड- बाईट- मुख्यमंत्री - - -**

मुंबईसह राज्यात सर्वत्र घरोघरी गणेशमूर्तींची स्थापना होत आहे. आजच हरतालिका तृतीया असल्यानं सकाळी घरोघरी हरतालिकेच्या मूर्तींची स्थापना आणि पूजा करण्यात आली. पर्यावरणस्नेही साहित्यापासून बनवलेल्या मूर्ती आणि सजावटीला पसंती मिळत आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मोठमोठ्या मूर्ती आधीच मंडपात विराजमान झाल्या असून आता हळू हळू दर्शनासाठी रांगा लागू लागल्या आहेत. श्रींच्या आगमनासाठी यंदा ध्वनी प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीनं पारंपरिक वाद्यांच्या वापरावर भर दिल्याचं दिसतं. प्रसाद आणि मिठाई खरेदी करताना ग्राहक विशेष सावधगिरी बाळगत आहेत. गणेशोत्सवानिमित्त विविध कल्याणकारी उपक्रम राबवण्यात येत असून सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल आहे. राज्यशासनातर्फे तसंच इतर संस्थांतर्फे गणेशोत्सव सजावटीच्या स्पर्धा आयोजित करण्यात

आल्या आहेत. गणेशोत्सवादरम्यान गर्दीचा विचार करुन  ठिकठिकाणी वाहतुकीचं नियोजन करण्यात आलं आहे. पोलीस बंदोबस्तही ठेवला आहे.

गणेशचतुर्थी निमित्त सार्वजनिक सुट्टी असल्यानं आज दोन्ही शेअर बाजार बंद आहेत.

गणेश चतुर्थीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू,उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी  शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

**राज्यात** इतरत्रही गणेशचतुर्थी भक्तिभाव आणि उत्साहात साजरी होत आहे. गणरायाच्या आगमनानं सर्वत्र उत्सवी वातावरण असून, यंदा आरोग्यजागृती, सुरक्षितता आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवावर भर दिला जात आहे.

**सिंधुदुर्गमध्ये** ७४ हजार ३५१ घरगुती आणि ३२ सार्वजनिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना झाली. पारंपरिक लाकडी माटवीत फळाफुलांची सजावट आणि चाकरमान्यांचं मोठ्या संख्येनं आगमन हे उत्सवाचं वैशिष्ट्य ठरलं आहे.

**बीडमध्ये** १ हजार ७३८ गणेशमूर्तींची स्थापना अपेक्षित असून, २९२ ठिकाणी 'एक गाव, एक गणपती' उपक्रम राबवला जाणार आहे. उत्सवासाठी ८६६ होमगार्डसह पोलिसांचा बंदोबस्त तैनात आहे.

**अकोल्यात** गणेशमूर्ती आणि सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये गर्दी झाली असून, घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये दहा दिवसांच्या उत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे.

**नागपुरात** गणेशमूर्ती खरेदीसाठी चितार ओळी मध्ये सकाळपासून भाविकांची गर्दी झाली. महानगरपालिका १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान 'श्री गणेशा आरोग्याचा' अभियान राबवणार असून, गणेश मंडळांच्या सहकार्यानं आरोग्य आणि रक्तदान शिबिरं घेणार आहे.

**अमरावती**तही या अभियानाची व्यापक अंमलबजावणी केली जाणार आहे.

**चंद्रपूर** जिल्ह्यात १३ हजार ४५५ घरगुती, १ हजार ९९९ सार्वजनिक आणि ४३१ 'एक गाव, एक गणपती' अशा एकूण १५ हजार ८८५ ठिकाणी गणेशमूर्तींची स्थापना होणार आहे. सुमारे साडेतीन हजार पोलिस आणि सुरक्षा कर्मचारी तैनात केले आहेत.

**दरम्यान,** ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी आणि न्यायालयीन निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या मागणीसाठी नागपुरात मूक मोर्चा काढण्यात आला. भर पावसातही

विविध धर्मांचे धर्मगुरू, ज्येष्ठ नागरिक, महिला, रुग्णालय कर्मचारी, विद्यार्थी आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येनं सहभागी झाले.

<><><><><>

महाराष्ट्राची संस्कृती ही बहुभाषिक असून महाराष्ट्रानं सर्व भाषिकांना मोठ्या मनानं आपल्यात सामावून घेतलं आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. नवी मुंबईत वाशी इथं हिंदी दिवस २०२६ आणि सहावं अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. महाराष्ट्राइतका बहुभाषिक प्रदेश इतरत्र कुठंही नाही, असं शहा म्हणाले.

***होल्ड... बाईट- अमित शहा***

राजकीय मतभेद सोडून भारतीय भाषांना चालना देण्यावर भर द्यायचं आवाहन शहा केलं. या सर्व भाषांचा स्वर वेगवेगळा असला, तरी गीत एकच आहे, भारतीय भाषांना विज्ञानाची, साहित्याची भाषा करायचं आहे, एकमेकींशी जोडायचं आहे, असं त्यांनी सांगितलं. वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचं शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष हा यंदाच्या संमेलनाचा मध्यवर्ती विषय आहे. या गीताद्वारे बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पाया रचला, असं शहा यांनी सांगितलं. गणेशोत्सवानिमित्त त्यांनी शुभेच्छा दिल्या.

आपण आपल्या भाषांचा सन्मान केला नाही, तर जगही करणार नाही, त्यामुळे राजभाषा, निजभाषा, मातृभाषेसह देशातल्या सर्व भाषांचा सन्मान करणं गरजेचं आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. स्वातंत्र्य संग्रामात हिंदी भाषेनं संपर्कसूत्र म्हणून मोठं योगदान दिल्याचा उल्लेख त्यांनी केला.

केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह इतर या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी शहा यांनी राजभाषा गौरव आणि राजभाषा कीर्ती पुरस्कारांचं वितरण केलं. तसंच विविध पुस्तकं आणि ॲप्सचं लोकार्पणही शहा यांच्या हस्ते यावेळी झालं.

<><><><><>

अन्नपदार्थ, इंधन, ऊर्जा तसंच औद्योगिक उत्पादनांच्या किमतीत  वाढ झाल्यानं ऑगस्ट महिन्यात घाऊक किमतीवर आधारित चलन फुगवट्याच्या दरात ९ पूर्णांक ९२ शतांश टक्के वाढ झाली. जुलै महिन्यात ही वाढ ९ पूर्णांक ७८ शतांश टक्के नोंदवली गेली

होती. केंद्र सरकारनं आज ही आकडेवारी जाहीर केली. जुलै महिन्यात ६ पूर्णांक ६५ शतांश टक्के वाढ दाखवणारा अन्नपदार्थ निर्देशांक ऑगस्ट महिन्यात ७ पूर्णांक ५ शतांशांनी वाढला, इंधन आणि ऊर्जा क्षेत्रांचा घाऊक किंमतीवर आधारित चलन फुगवट्याचा दर २२ पूर्णांक ९३ शतांश टक्के राहिला.

पश्चिम आशियातली युद्ध परिस्थिती आणि त्यामुळे झालेली होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी यामुळे घाऊक किंमत निर्देशांकानं वरच्या दिशेनं प्रवास केला आहे, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे १५ सप्टेंबरला एकटेच मुंबईला येणार असून त्यांनी इतर मराठा बांधवांना मुंबईकडे न येण्याचं आवाहन केलं आहे. सणावारांच्या कालावधीत दंगल घडवून मराठा समाजाला गालबोट लावण्याच्या प्रयत्न केला जाणार असल्याचं मत जरांगे यांनी सूत्रांकडे व्यक्त केलं आहे.

<><><><><>

दिशा सालियान मृत्यू प्रकरणी सीबीआयनं एफआयआर दाखल करून घेतला आहे. त्यानुसार, हा एफआयआर काल दाखल झाला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, त्यांचे सुरक्षारक्षक, दिनो मोरिया, रोहन रॉय, सूरज पंचोली, रिया चक्रवर्ती, शोविक चक्रवर्ती, पोलीस अधिकारी सचिन वाझे, परमबीर सिंह यांच्यासह इतर अनेक जणांचा उल्लेख एफआयआरमध्ये करण्यात आला आहे.

<><><><><>

गोवा नाइट क्लब आग प्रकरणी, त्या नाइट क्लबचे मालक गौरव लुथरा आणि सौरभ लुथरा यांनी आत्मसमर्पण केलं आहे. त्यांचा जामीन रद्द करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयानं शिक्कामोर्तब केल्यानंतर या दोघांनी आज म्हापसा सत्र न्यायालयासमोर आत्मसमर्पण केलं.

<><><><><>

अलेक्झांडर झ्वेरेव्हनं अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. रात्री उशिरा झालेल्या सामन्यात त्यानं बेन शेल्टनवर ६-३, ७-६, ५-७, ६-

२ अशी मात केली. या हंगामातलं झ्वेरेव्हचं हे दुसरं ग्रँडस्लॅम अजिंक्यपद आहे. जून महिन्यात त्यानं फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेचं जेतेपद मिळवलं होतं.

//<><><><><>//